माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३४८३**

**अपिलार्थी श्री. ॲड. प्रशांत दिवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
एच. आर. कॉलेज, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०८.२०२४ | ०२.०९.२०२४ | १०.०९.२०२४ | २२.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०२.०९.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.१०.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "H.R. महाविद्यालयाने आग प्रतिबंधक आणि जीव संरक्षक उपाययोजनासाठी वेळोवेळी कोणती काळजी घेतली व त्यासंबंधी मॉक डील घेतली आहे का, असेल तर त्याच्या संबंधी असलेल्या कागदपत्रांची छायांकित व साक्षांकित प्रत.*

*(२) आपल्या महाविद्यालयाने सहामाही अग्निशमन दलाला आपला अहवाल सादर केला आहे का, असल्यास त्याची छायांकित व साक्षांकित प्रत.*

*(३) अग्निशमन विभागाने आपल्या महाविद्यालयाची तपासणी करुन दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची छायांकित व साक्षांकित प्रत."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, The Government Approved Licensed Fire Agency has completed the inspection of the Fire Prevention and Life Safety Measures at the College premises. They have certified that the following systems were maintained in good and efficient condition for the period from January 2024 to June 2024, as required by the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006 (Mah. III of 2007):

..२/-

1. Fire Fighting Hydrant System. 2. Fire Alarm and Smoke Detection System

Please be advised that the Certificate of Inspection for the Fire Prevention and Life Safety Measures is deemed confidential and personal. Consequently, it cannot be disclosed.

४. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १०.०९.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेले उत्तर योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तसेच त्यांचे अधिवक्ता उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, संबंधीत महाविद्यालयात अग्निशमन यंत्रणेमध्ये त्रुटी असल्याने अग्निशमन विभागाव्दारे अनेकदा नोटीस देण्यात आलेले आहे. तसेच सदर इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झाल्याने अग्निशमन यंत्रणाने हरकत घेतलेली आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, महाविद्यालय येथे आगीची घटना घडलेली नाही व नियमाप्रमाणे दर ६ महिन्यांनी शासन मान्यताप्राप्त एजन्सीव्दारे महाविद्यालयात अग्निशमन यंत्रणाची तपासणी केली जाते व अपिलार्थींनी माहिती अर्ज सादर केला तेव्हा संबंधीत एजन्सीनी अग्निशमन यंत्रणा जानेवारी- २०२४ ते जुन- २०२४ या कालावधी करीता निरीक्षण करुन यंत्रणा व्यवस्थित असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

७. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०२.०९.२०२४ मध्ये नमुद केलेले शासन मान्यताप्राप्त एजन्सीने त्यांचे महाविद्यालयातील जानेवारी- २०२४ ते जून- २०२४ कालावधी करीता केलेली तपासणी व यंत्रणा व्यवस्थित असल्याचे प्रमाणपत्राची प्रत अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**

8-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai